Estd : 1962
NAAC "A" Grade

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA**
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र**
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९००० संलग्नता टी-२ विभाग दूरध्वनी -०२३१ - २६०९०९१
संचालक, बी.सी.यु.डी. कार्यालय, दूरध्वनी : (थेट) ०२३१ - २६०९०७०

## -:: परिपत्रक ::-

### स्थानिक चौकशी समिती अहवाल नमुने आवश्यक माहिती नमूद करून स्वयंमुल्यांकनासह विद्यापीठ कार्यालयास सादर करणेबाबत....

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांकडून प्राथमिक संलग्निकरण, नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार इत्यादि प्रकारातील प्रस्ताव दरवर्षी आवश्यकतेनुसार मान्यतेकामी सादर केले जातात. सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने महाविद्यालयांच्या प्रत्यक्ष तपासणीकामी स्थानिक चौकशी समित्या पाठवाव्या लागतात. याकामी समित्यांना स्थानिक चौकशी समिती अहवाल विद्यापीठामार्फत पुरविले जातात. स्थानिक चौकशी समिती अहवालांमध्ये सुधारणा करून गुणांक पध्दतीने नवीन अहवाल नमुने तयार करण्यात आले आहेत. सदरचे अहवाल नमुने विद्यापीठ संकेतस्थळावर **(www.unishivaji.ac.in → BCUD → Affiliation T 2 Information Lists → Point Base Final Local Inquiry Committee Report Formats)** शाखानिहाय प्रसिध्द करण्यात आले आहेत.

**या अनुषंगाने कळविण्यात येते की,**

१. विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांनी संलग्नीकरणाकरिता सादर केलेल्या प्रस्तावानुसार स्थानिक चौकशी समिती अहवालामधील आवश्यक असणारे मुद्दे, नमुने व शाखानिहाय प्रपत्र अ, ब आणि क मधील आवश्यक सर्व माहिती स्वयंमुल्यांकनासह योग्यरित्या भरावी. अहवालामध्ये नमूद प्रपत्र - अ, ब आणि क अन्वये मुद्देनिहाय व क्रमनिहाय कागदपत्रे (Indexing Format) जुळवून, त्यास प्रपत्र व त्यामधील नमूद क्रमांक, उपक्रमांक टाकून ती स्कॅन करून त्याची PDF मध्ये सी.डी. तयार करावी. हार्डकॉपी व सीडीमधील कागदपत्रांचा क्रम प्रपत्रांमधील मुद्यांनुसार एकच असणे आवश्यक आहे. महाविद्यालय सदरची हार्डकॉपी व सी.डी. स्थानिक चौकशी समितीच्या कामकाजाकरिता आपल्याकडे तयार ठेवील व समितीच्या प्रत्यक्ष भेटीदरम्यान सी.डी. व क्रमनिहाय कागदपत्रे समितीच्या निदर्शनास आणून देईल. **<u>सारांशाने,</u>** अहवालात नमूद केलेल्या, लागू असणाऱ्या प्रत्येक मुद्यानुसार कागदपत्रे तयार करून त्याची सीडी तयार करावी व सदरची सीडी आणि जुळणी केलेली कागदपत्रे व्यवस्थितरित्या मुद्देनिहाय समितीच्या निदर्शनास आणावीत.

२. उपरोक्त मुद्दा क्र. १ नुसार तयार करण्यात आलेली सी.डी. व शाखानिहाय लागू असणारी केवळ प्रपत्रे (अहवालात नमूद केलेल्या प्रपत्रांनुसार मुद्देनिहाय व क्रमनिहाय जुळणी करण्यात आलेल्या कागदपत्रांची हार्डकॉपी विद्यापीठास सादर करू नये) विद्यापीठ कार्यालयास दोन प्रतींत तात्काळ सादर करावीत. सी.डी. व प्रपत्रांशिवाय इतर कोणतीही अधिकची कागदपत्रे अथवा माहिती विद्यापीठ कार्यालयास महाविद्यालयाकडून पाठविण्यात येऊ नये, त्याचा स्वीकार केला जाणार नाही. **<u>सारांशाने,</u>** अहवालात नमूद मुद्देनिहाय व क्रमनिहाय कागदपत्रांची जुळणी करून तयार करण्यात आलेली सी.डी. व केवळ शाखानिहाय लागू असणारी प्रपत्रेच (मुद्देनिहाय व क्रमनिहाय जुळणी केलेल्या कागदपत्रांची हार्डकॉपी कोणत्याही परिस्थितीत सादर करू नये) विद्यापीठ कार्यालयास सादर करावीत.

३. महाविद्यालयाकडून पाठविण्यात आलेली उपरोक्त शाखानिहाय व लागू असणारी प्रपत्रे आणि उपरोक्त मुद्दा क्र. १ नुसार तयार करण्यात आलेली सी.डी. विद्यापीठामार्फत स्थानिक चौकशी समितीच्या कामकाजाकरिता समितीस पाठविण्यात येईल. स्थानिक चौकशी समिती विद्यापीठामार्फत पुरविण्यात आलेली प्रपत्रे, सी.डी. यांची महाविद्यालयामध्ये उपरोक्त मुद्दा क्र. १ अनुसार तयार करण्यात आलेल्या कागदपत्रांशी खातरजमा करील व अनुरूप गुणांकन व शिफारस करील. स्थानिक चौकशी समितीने कामकाज पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयाच्या **<u>प्रस्तावानुसार केवळ लागू असणारी प्रपत्रेच गुणांकन व शिफारशीसही सी.डी. मध्ये घेवून सदरची प्रपत्रे (हार्डकॉपी) व सी.डी. PDF मध्ये या कार्यालयास सादर करावयाची आहे.</u>** स्थानिक चौकशी समितीने हार्डकॉपी सादर करताना प्रपत्रांशिवाय इतर अधिकची कागदपत्रे सादर करू नयेत.

महाविद्यालयांकडून उपरोक्त मुद्दा क्र. १ व २ अनुसार, कामकाज पूर्ण झालेनंतर स्थानिक चौकशी चौकशी समित्या पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.

कुलसचिव

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
जा.क्र. : शिवाजी विद्यापीठ/संलग्नता/टी-२/ 8
दिनांक : 16 JAN 2018

D:\Baba\2017-18\Circular Format.Docx